कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्प मंडळांतर्गतचा म्हैसाळ पंपगृह विभाग क्र.१, सांगली हा बांधकाम कार्यप्रकारातील विभाग सिंचन व्यवस्थापन कार्यप्रकारात वर्ग करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्रमांक : आढावा २०१४/प्र. क्र.१३७/२०१४/आ (प्रशि)

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
तारीख: १६ जानेवारी, २०१६

वाचा- १) शासन निर्णय वित्त विभाग क्र.ईआरडब्ल्यू-१०८३/सीआर-६११/८३/एडीएम-९, दि. ०८/०३/१९८४.
२) शासन निर्णय वित्त विभाग क्रमांकः १०९२/सीआर/८०६/व्यय-६, दिनांक १५/१०/१९९२.
३) शासन निर्णय पाटबंधारे विभाग क्र.आढावा-/१००२/३३५/२००२/आ.(प्रशि), दि.०६/०२/२००३.
४) शासन निर्णय जलसंपदा विभाग क्र. आढावा-२०१४/प्र.क्र.१३७/२०१४/आ.(प्रशि.), दि.३०/३/१५.

प्रस्तावना -

कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्प मंडळ, सांगलीच्या अंतर्गत बांधकाम आणि विद्युत व यांत्रिकी कार्यप्रकारातील एकूण ४ विभाग व २३ उपविभाग कार्यरत आहेत. मंडळांतर्गत कृष्णा कोयना उपसा सिंचन योजनेचे काम प्रगतीपथावर आहे. सदर उपसा सिंचन योजनेत ताकारी व म्हैसाळ असे दोन घटक आहेत. ताकारी उपसा सिंचन योजनेची एकूण सिंचन क्षमता ३४,४०० हेक्टर (पीक क्षेत्र) असून फेब्रुवारी, २०१४ अखेर १६,५७० हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली आहे व म्हैसाळ उपसा सिंचन योजनेची एकूण सिंचन क्षमता ८२,९२२ हेक्टर (पीक क्षेत्र) सिंचन क्षमता असून फेब्रुवारी, २०१४ अखेर २२,०६६ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. प्रकल्पीय एकूण १,१७,३२२ हेक्टर (पीक क्षेत्र) सिंचन क्षमतेपैकी ३८,६३६ हेक्टर (६०,२६५ हेक्टर रब्बी समतुल्य) सिंचन क्षमता निर्मिती झाली आहे. गेल्या १० वर्षापासून बांधकाम मंडळामार्फतच निर्माण झालेल्या सिंचन क्षेत्राच्या सिंचन व्यवस्थापनाचे काम करण्यात येत आहे. बांधकाम मंडळाकडे सिंचन व्यवस्थापनाची स्वतंत्र आस्थापना नसल्याने, सदर प्रकल्पाच्या सिंचन व्यवस्थापनासाठी स्वतंत्र विभाग, उपविभाग व शाखा निर्माण करणे आवश्यक आहे.

यानुसार म्हैसाळ पंपगृह विभाग क्र.१, सांगली, हा बांधकाम विभाग व त्यांच्याकडील अस्तित्वातील ७ उप विभागांपैकी म्हैसाळ पंपगृह उपविभाग क्र.३, आरग व म्हैसाळ कालवा सर्वेक्षण उपविभाग क्र.२, बेळंकी या दोन उपविभागांसह, तसेच ताकारी पंपगृह विभाग क्र.१, देवराष्ट्रे या विभागाकडील अस्तित्वातील ताकारी कालवा उपविभाग क्र.१, वांगी व ताकारी पंपगृह उपविभाग क्र.३, देवराष्ट्रे ह्या दोन उपविभागांसह सिंचन व्यवस्थापन विभागात रुपांतरीत करुन, सांगली पाटबंधारे मंडळ, सांगली अंतर्गत कार्यान्वित करण्यास संदर्भिय क्र.४ येथील दि.३०.०३.२०१५

रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात आली होती. तथापि, सदर शासन निर्णय अधिक्रमित करुन सिंचन व्यवस्थापन कामासाठी रुपांतरीत म्हैसाळ पंपगृह विभाग क्र.१, सांगली हा विभाग व ४ उप विभाग कार्यालये कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्प मंडळ, सांगली अंतर्गत सिंचन व्यवस्थापन कामासाठी कार्यान्वित करण्याचे विचाराधीन होते. त्या अनुषंगाने शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय-

कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे अंतर्गतच्या मुख्य अभियंता (विप्र), जलसंपदा विभाग, पुणे या प्रादेशिक कार्यालयाच्या अधिनस्त कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्प मंडळ, सांगली अंतर्गत असलेला म्हैसाळ पंपगृह विभाग क्र.१, सांगली व त्या विभागांतर्गतचे म्हैसाळ पंपगृह उपविभाग क्र.३, आरग व म्हैसाळ कालवा सर्वेक्षण उपविभाग क्र.२, बेळंकी, तसेच ताकारी पंपगृह विभाग क्र.१, देवराष्ट्रे या विभागाकडील ताकारी कालवा उपविभाग क्र.१, वांगी व ताकारी पंपगृह उपविभाग क्र.३, देवराष्ट्रे असा १ विभाग व ४ उपविभाग सिंचन व्यवस्थापन कार्यालयात रुपांतरित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सिंचन व्यवस्थापन कार्यप्रकारात रुपांतरीत केलेल्या म्हैसाळ पंपगृह विभाग क्र.१, सांगली या विभागीय कार्यालयाचे नाव **ताकारी म्हैसाळ उपसा सिंचन व्यवस्थापन विभाग, सांगली** असे होत असून, या विभागीय कार्यालयांतर्गत सिंचन व्यवस्थापन कामासाठी ४ उप विभागीय व नवीन निर्मित १८ सिंचन शाखा कार्यालयांसह **कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्प मंडळ, सांगली अंतर्गत कार्यान्वित करण्यात येत आहे.**

२. उपरोक्त रुपांतरणामुळे कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्प मंडळ, सांगली या मंडळांतर्गत ताकारी म्हैसाळ उपसा सिंचन व्यवस्थापन विभागांतर्गत उप विभाग/ शाखा कार्यालयांची रचना सोबतच्या “प्रपत्र-अ” प्रमाणे राहील.

३. सदर ताकारी म्हैसाळ उपसा सिंचन व्यवस्थापन विभाग व त्याअंतर्गत कार्यालयांना खालील अटींच्या अधीन राहून शासन मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

अ) कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्प मंडळ, सांगली अंतर्गत असलेला म्हैसाळ पंपगृह विभाग क्र.१, सांगली व त्या विभागांतर्गतचे म्हैसाळ पंपगृह उपविभाग क्र.३, आरग व म्हैसाळ कालवा सर्वेक्षण उपविभाग क्र.२, बेळंकी, तसेच ताकारी पंपगृह विभाग क्र.१, देवराष्ट्रे या विभागाकडील ताकारी कालवा उपविभाग क्र.१, वांगी व ताकारी पंपगृह उपविभाग क्र.३, देवराष्ट्रे अशा प्रकारे बांधकाम कार्यप्रकारातील १ विभाग व ४ उपविभाग कार्यालयांतर्गतची संपूर्ण आस्थापना मंजूर पदांसह ताकारी म्हैसाळ उपसा सिंचन व्यवस्थापन विभाग, सांगली या सिंचन व्यवस्थापन विभागांतर्गत कार्यरत राहील.

आ) सदर सिंचन व्यवस्थापन विभाग व त्या अंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या उपविभाग/शाखा कार्यालयांना आवश्यक असलेली पदे “प्रपत्र-ब” मधील पदांमधूनच वापरण्यात यावीत. सद्य:स्थितीत कोणतीही नवीन पदे निर्माण करण्यात येत नाहीत.

इ) उपलब्ध रुपांतरित अस्थायी आस्थापनेवरील पदांकडून समकक्ष वेतनश्रेणीतील पदांची कामे अतिरिक्त कार्यभार देवून करुन घेता येतील.

ई) सिंचन व्यवस्थापन कामासाठी रुपांतरीत झालेली सर्व कार्यालये शासकीय जागेतच ठेवावीत, त्यासाठी बांधकामाचा वेगळ्याने खर्च करु नये. तसेच सध्याच्या कार्यरत विभाग/उपविभागांतील उपलब्ध साहित्याचाच वापर करण्यात यावा. प्रशासकीय, आस्थापना खर्चात वाढ होणार नाही याची दक्षता घ्यावी, जेणेकरुन शासनावर कोणताही आर्थिक भार पडणार नाही.

४. शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक ईआरडब्ल्यू-१०८३/सीआर-६११/८३/एडीएम-९, दिनांक ८ मार्च, १९८४ मधील तरतूदीनुसार, मुख्य अभियंता (वि.प्र.), जसंवि, पुणे अंतर्गत "अधीक्षक अभियंता, कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्प मंडळ, सांगली" यांना नियंत्रक अधिकारी व "कार्यकारी अभियंता, ताकारी-म्हैसाळ उपसा सिंचन विभाग, मुख्यालय-सांगली" यांना आहरण व संवितरण अधिकारी घोषित करण्यात येत आहे.

५. या प्रकरणी होणारा खर्च मुख्य लेखाशिर्ष "२७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे, ००१ संचालन व प्रशासन, (०४) व्यवस्थापन आस्थापना, (०४)(०८) अधीक्षक अभियंता, सांगली पाटबंधारे मंडळ, सांगली(२७०१ ९९४२)" या लेखाशिर्षा खाली मंजूर अनुदानातून भागवावा.

६. उपरोक्त नमूद विभाग / उप विभाग कार्यालयांच्या मूळ कार्यप्रकारात व उप विभागीय कार्यालयांच्या विभागीय नियंत्रणात बदल होत असल्याने या कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी यांच्या वेतनाबाबत दिनांक २९.०२.२०१६ पर्यंत सध्याची कार्यपध्दती चालू ठेवण्यात यावी. तसेच विभागाकडील उर्वरित बांधकाम कार्यप्रकारातील उप विभाग यांच्या कार्यान्वितीकरणाबाबतचा निर्णय मुख्य अभियंता (वि.प्र.), जलसंपदा विभाग, पुणे यांनी तात्काळ घ्यावा.

७. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.१०९२/सीआर/८०६/व्यय-६, दिनांक १५/१०/१९९२ मधील तरतूदीनुसार विभागास प्रदान केलेल्या प्राधिकारानुसार व आंतर वित्त सल्लागार व उप सचिव यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०११६१६१८४७१२२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Shubhangi Ajit Gosavi

Digitally signed by Shubhangi Ajit Gosavi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Shubhangi Ajit Gosavi
Date: 2016.01.16 16:34:30 +05'30'

(शुभांगी गोसावी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३) मा.मंत्री (जलसंपदा) यांचे खाजगी सचिव
४) मा.राज्यमंत्री (जलसंपदा) यांचे स्वीय सहायक

५) मा.विधानसभा/विधान परिषद सदस्य (सर्व)
६) प्रधान सचिव (ज.सं.प्र.व विकास), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
७) सचिव (ज.सं.व्य.व लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
८) महालेखापाल १ व २, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर
९) महालेखापाल १ व २, महाराष्ट्र राज्य (लेखापरीक्षा) मुंबई/नागपूर
१०) संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई
११) सर्व कार्यकारी संचालक, महामंडळे / सर्व महासंचालक
१२) सर्व मुख्य अभियंता व सह सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
१३) सर्व मुख्य अभियंता/ अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग (क्षेत्रीय कार्यालय)
१४) मुख्य अभियंता (वि.प्र.) जलसंपदा विभाग, पुणे
१५) मुख्य अभियंता (जसं), जलसंपदा विभाग, पुणे
१६) आंतर वित्तीय सल्लागार व उप सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
१७) अधीक्षक अभियंता, कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्प मंडळ, सांगली
१८) अधीक्षक अभियंता, सांगली पाटबंधारे मंडळ, सांगली
१९) कार्यकारी अभियंता, म्हैसाळ पंपगृह विभाग क्र.१, सांगली
२०) कार्यकारी अभियंता, ताकारी पंपगृह विभाग क्र.१, देवराष्ट्रे
२१) सर्व अधिकारी व कार्यासने, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
२२) संगणक कार्यक्रम कक्ष, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई (कार्यालयांच्या पुनर्रचनेची आवश्यक ती नोंद विभागाच्या संकेतस्थळावर घेण्यास्तव अग्रेषित)
२३) कार्यासन आस्थापना (प्रशिक्षण) संग्रहार्थ.

(प्रपत्र-अ)
कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्प मंडळ, सांगली अंतर्गत सिंचन व्यवस्थापन कार्यप्रकारातील विभाग उपविभाग / शाखा कार्यालयांचा तपशील

कार्यालयाचा प्रकार	सध्याची रचना	बदलानंतरची रचना	नवीन शाखा कार्यालय (सिंचन व्यवस्थापन शाखा)	सिंचन क्षमता (हेक्टरमध्ये)
प्रदेश कार्यालय -	मुख्य अभियंता (वि.प्र.), जलसंपदा विभाग, पुणे	मुख्य अभियंता (वि.प्र.), जलसंपदा विभाग, पुणे		**एकूण ६०,२६५ हेक्टर**
मंडळ कार्यालय -	कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्प मंडळ, सांगली (बांधकाम)	कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्प मंडळ, सांगली **(बांधकाम+सिंचन)**		
विभाग कार्यालय -	म्हैसाळ पंपगृह विभाग क्र.१, सांगली (बांधकाम)	**ताकारी म्हैसाळ उपसा सिंचन व्यवस्थापन विभाग, सांगली.**		
उपविभागीय कार्यालये -	१. म्हैसाळ पंपगृह उपविभाग क्र.३, आरग (बांधकाम)	**म्हैसाळ उपसा सिंचन व्यवस्थापन उपविभाग क्र.३, आरग**	१) म्हैसाळ उपसा सिंचन व्यवस्थापन शाखा क्र.१, म्हैसाळ २) म्हैसाळ उपसा सिंचन व्यवस्थापन शाखा क्र.२, मालगांव ३) म्हैसाळ उपसा सिंचन व्यवस्थापन शाखा क्र.३, आरग ४) म्हैसाळ उपसा सिंचन व्यवस्थापन शाखा क्र.४, लिंगनूर ५) म्हैसाळ उपसा सिंचन व्यवस्थापन शाखा क्र.५, बेळंकी	२०,०९६ हेक्टर
	२. म्हैसाळ कालवा सर्वेक्षण उपविभाग क्र.२, बेळंकी (बांधकाम)	**म्हैसाळ उपसा सिंचन व्यवस्थापन उपविभाग क्र.२, बेळंकी**	१) म्हैसाळ उपसा सिंचन व्यवस्थापन शाखा क्र.६, सलगरे २) म्हैसाळ उपसा सिंचन व्यवस्थापन शाखा क्र.७, शिरढोण ३) म्हैसाळ उपसा सिंचन व्यवस्थापन शाखा क्र.८, गव्हाण ४) म्हैसाळ उपसा सिंचन व्यवस्थापन शाखा क्र.९, कुची ५) म्हैसाळ उपसा सिंचन व्यवस्थापन शाखा क्र.१०, बनेवाडी	१६,०५९ हेक्टर

कार्यालयाचा प्रकार	सध्याची रचना	बदलानंतरची रचना	नवीन शाखा कार्यालय (सिंचन व्यवस्थापन शाखा)	सिंचन क्षमता (हेक्टरमध्ये)
	ताकारी पंपगृह विभाग क्र.१, देवराष्ट्रे अंतर्गतचे २ उप विभाग			
<u>**उपविभागीय कार्यालये**</u>	३. ताकारी कालवा उपविभाग क्र.१, वांगी (बांधकाम)	**ताकारी उपसा सिंचन व्यवस्थापन उपविभाग क्र.१, वांगी**	१. ताकारी उपसा सिंचन व्यवस्थापन शाखा क्र.१, ताकारी २. ताकारी उपसा सिंचन व्यवस्थापन शाखा क्र.२, देवराष्ट्रे ३. ताकारी उपसा सिंचन व्यवस्थापन शाखा क्र.३, वांगी ४. ताकारी उपसा सिंचन व्यवस्थापन शाखा क्र.४, कडेपूर	१०,३७८ हेक्टर
	४. ताकारी पंपगृह उपविभाग क्र.३, देवराष्ट्रे (बांधकाम)	**ताकारी उपसा सिंचन व्यवस्थापन उपविभाग क्र.३, तासगांव**	१) ताकारी उपसा सिंचन व्यवस्थापन शाखा क्र.५, आळसंद २) ताकारी उपसा सिंचन व्यवस्थापन शाखा क्र.६, आळते ३) ताकारी उपसा सिंचन व्यवस्थापन शाखा क्र.७, विसापूर ४) ताकारी उपसा सिंचन व्यवस्थापन शाखा क्र.८, तासगांव	१३,७३२ हेक्टर

Shubhangi Ajit Gosavi

Digitally signed by Shubhangi Ajit Gosavi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Shubhangi Ajit Gosavi
Date: 2016.01.16 16:35:10 +05'30'

(शुभांगी गोसावी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रपत्र – ब

कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्प मंडळ, सांगली अंतर्गत ताकारी-म्हैसाळ उपसा सिंचन व्यवस्थापन विभाग, सांगली या रुपांतरीत सिंचन व्यवस्थापन विभाग व अंतर्गत कार्यालयांसाठी वर्ग करावयाच्या पदांचा तपशील (मंजूर पदांचा तपशील)

अ.क्र.	वर्गवार पदाचे नांव	विभागीय पदे (१ विभाग)	उप विभागीय पदे (४ उपविभाग)	एकूण मंजूर पदे
१	कार्यकारी अभियंता	१	०	१
२	उप कार्य./उपविभा.अभि./ अधिकारी	१	४	५
३	सहा.अभि-२/शाखा अभि./ कनि. अभि.	४	१६	२०
४	विभागीय लेखापाल	१	०	१
५	प्रथम लिपिक	१	०	१
६	आरेखक	१	०	१
७	सहायक आरेखक	१	४	५
८	स्थापत्य अभि. सहायक	०	१६	१६
९	वरिष्ठ लिपिक	५	४	९
१०	कनिष्ठ लिपिक	४	८	१२
११	विभागीय भांडारपाल	१	०	१
१२	सहायक भांडारपाल	१	०	१
१३	लघु टंकलेखक / निम्नश्रेणी लघुलेखक	१	०	१
१४	संगणक	१	०	१
१५	टंकलेखक	३	४	७
१६	वाहनचालक	१	४	५
१७	नाईक	१	०	१
१८	शिपाई	५	८	१३
१९	चौकीदार	१	४	५
	एकूण :-	**३४**	**७२**	**१०६**

Shubhangi Ajit Gosavi

Digitally signed by Shubhangi Ajit Gosavi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Shubhangi Ajit Gosavi
Date: 2016.01.16 16:35:55 +05'30'

(शुभांगी गोसावी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन